MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०२ | अंक –१२७ | बुधवार दि.२२ जानेवारी २०२५ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -127 | WEDNESDAY DT.22 JANUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4




## ट्रकच्या भीषण अपघातात दोघे ठार

आष्टी ।प्रतिनिधी

तालुक्यातील गोखेल येथील नवनाथ दहिफळे यांचा मुलगा गणेश दहिफळे व किन्नर नितीन राठोड राहणार बोधेगाव हे दोघे ओडिसा राज्यातील खडकपूर येथे दिनांक १९ रोजी २०२५ रोजी नगर येथील कांदा मार्केट येथून कांदा घेऊन जात असताना पहाटेच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात हे दोघे जागीच ठार झाले यात गणेश दहिफळे वय अंदाजे ३२ वर्ष आष्टी तालुक्यातील गोखेल गावचे चालक पालक असून त्यांच्या पश्चात दोन मुल, व पत्नी जनाबाई दहिफळे ,आहेत तसेच दुसरे किन्नर नितीन राठोड वय अंदाजे १८ वर्षे राहणार बोधेगाव तालुका शेवगाव यांचा समावेश आहे या घटनेमुळे गहूखेल येथील लोकांकडून हळहळ व्यक्त होत आहे

# पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यातून महिन्याला कोट्यावधी रुपयांची उलाढाल तर हप्त्याची लाखोंची लाच!





### पेठ बीड पोलिसांकडून मटका माफीयांना पाठिंबा तर एसपी नवनीत कॉवतांना मटकाकिंग संपवण्याचे आवाहन?

### पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत मटका किंग जोमात आणि खेळ राजरोसपणे सुरू? एकाच मटकाबुकिच्या मालकाकाचा २५० पेक्षा जास्त मटका बुकी लिहिला व खेळला जातो; पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये हनुमंत उगलेच्या आशिर्वादानेच सुरू?

### एसपी नवनीत कॉवत साहेबांकडून अवैध धंदे बंद मात्र हनुमंत उगलेंच्या आशिर्वादाने पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत राजरोजपणे मटका सुरूच?

### जनतेला एसपी नवनीत कॉवत यांच्याकडून पेठ बीड मधील मटक्याची दादागिरी संपवण्याची अपेक्षा?

### एकट्या पेठ बीड मधून कल्याण मुंबई नावाचा जुगार खुलेआम त्यातून लाखोंची उलाढाल? नवनीत कॉवत यांच्या कार्यकाळात दोन नंबरचे धंदे बंद मग हनुमंत उगलेने हप्त्याचे जमा केलेले मोठमोठे पाकीट नेमके जातात कोणत्या पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांच्या खिशात हनुमंत उगलेच्या मोबाईल नंबर वरुन सर्व निष्पन्न होईल, चौकशी होणे गरजेचे?

### पेठ बीड पोलीस स्टेशनच्या हद्दीत माफियांकडून लाखोंची उलाढाल करणाऱ्या हनुमंत उगलेंवर कारवाई होणे गरजेचे?

### राजरोसपणे खेळला व लिहिला जातो मटका!

नवीन मोंढा, हनुमान नगर, अयोध्या नगर, एमआयडीसी, रामतीर्थ चौक, बालाजी मंदिर परिसर, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, जुना मोंढा, चिंचाखाली मोंढा मध्ये शीतल वस्त्र भांडार परिसर शुक्रवार पेठ मोंढा, संतोषी माता मंदिर चौक, काळा हनुमान ठाणे, खंडेश्वरी परिसर, पूरग्रस्त कॉलनी, नाळवंडी नाका चौक, नाळवंडी रोड, पाण्याची टाकी, गांधीनगर शिवसेनेच्या वेशी जवळ तेलगाव नाका चौक, बार्शी नाका चौक, ढगे कॉलनी देशी दारू दुकान परिसर, इमामपूर रोड, प्रकाश आंबेडकर नगर, जुने आरटीओ ऑफिस, एसटी वर्कशॉप जवळ, कत्तलखाना परिसर, मोमीनपुरा, टी पॉइंट चांदणी चौक, खडकपुरा कंकालेश्वर मंदिर परिसर, बकरा मटन मार्केट कडबा बाजारतळ शनिवार पेठ सुभाष कॉलनी इस्लामपुरा बामणवाडी महत्त्वाचा परिसर म्हणजे पेठ बीड पोलीस ठाण्याच्या पाठीमागे व पुढे चारी बाजूने दारू पत्त्याचे क्लब मटक्याचे अड्डे व गांजा विक्री ही राजरोसपणे चालू आहे. या विक्रीतून अनेक वेळा हद्दीमध्ये ३०७ सारखे मोठमोठे गुन्हे दाखल झालेले आहेत. देशी दारू, विदेशी दारू, गुटखा मटका माफिया पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत माफिया बोकळला आहे. पेठ बीडचा बिहार झालेला असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. परंतु पेठ बीट ठाण्याचे पोलीस निरीक्षक अंधारातून या सर्वांना पाठबळ देत असल्याचे परिसरातील नागरिक कुजबूज करू लागले आहेत?


बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्याला मिळालेले नवीन सिंघम पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी जिल्ह्यातील अवैध धंदे मोडीत काढण्यासाठी मोठमोठ्या कारवाईचा धडाका लावला आहे. परंतु पेठ बीड पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंदे बोकाळले असून या ठिकाणी अवैध गुटखा ताडी ऑनलाइन चक्री, दारूचे अड्डे , अवैध ताडी, मटका, गांजा, नशेच्या गोळ्या असे अनेक बेकायदेशीरपणे अवैध धंदे चालू असून याकडे पेठ बीड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक हे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे दिसत आहे. मागील काही दिवसापूर्वी बीड शहर पोलीसांनी पेठ बीड पोलीस स्टेशन हद्दीत येऊन अवैध गुटखा साठा जप्त करून त्यावर कारवाई केली आहे. मात्र पेठ बीड पोलीसांना सगळं माहिती असून देखील याकडे डोळे झाकपणा करत आहे. बीड शहर पोलीस जर पेठ बीड पोलीस स्टेशन हद्दीत येऊन कारवाई करत असतील तर पेठ बीड पोलीस काय करत आहेत यावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी जरी बीड जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे प्रमुखांना कारवाईचे कडक आदेश दिले असले तरी या कडक आदेशाला पेठ बीड पोलीसांकडून दुर्लक्ष करत केराची टोपली दाखवली जात आहे. अनेक अवैध धंदे मोडीत काढण्यासाठी पोलीस अधीक्षक यांच्याकडून विशेष प्रयत्न चालू आहेत परंतु पेठ बीड पोलिसांकडून अवैध धंदे करणाऱ्यांना परवानगी मिळत असल्याची चर्चा आहे. असे जर असेल तर पेठ बीड पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंदे कसे बंद होणार याकडे पोलीस अधीक्षकांनी स्वतः लक्ष घालून संबंधित पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांवर निलंबाची कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. काही दिवसांपूर्वी बीड शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये फिरून गुटखा विक्री करणाऱ्या एका गुटका विकणाऱ्यास बीड शहर पोलिसांनी पकडले होते व त्याच्याकडून माहिती घेत बीड शहर पोलीसांनी पेठ बीड पोलीस स्टेशन हद्दीत जाऊन कारवाई केली जर बीड शहर पोलीस स्टेशन पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये जाऊन कारवाई करत असतील तर मग पेठ बीड पोलीस फक्त नावालाच का? जी गुटखा साठ्यावर बीड शहर पोलीसांनी कारवाई केली आहे त्या कारवाई मध्ये पेठ बीड पोलीस सामील होऊन संयुक्त कारवाई दाखवून मोठा पण दाखवलं आहे. परंतु खरी कारवाई बीड शहर पोलीसांनी केली आहे. याची देखील चौकशी होणे गरजेचे आहे. तसेच पेठ बीड पोलीस स्टेशनचे कर्मचारी हनुमंत उगले हे फक्त अवैध धंदे करणाऱ्यांकडून हप्ता गोळा करत आहेत. यामुळे अवैध धंदे करणाऱ्यांना खाकी वर्दीचा धाक राहिलेला नाही. पोलिसांनी हप्ता गोळा करून जर अवैध धंदे करणाऱ्यांना परवानगी देत असतील तर मग सर्व सामान्यांचे काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. अवैध धंदे करणाऱ्यांवर कठोर कारवाईची गरज भासत आहे मात्र पेठ बीड पोलीसांकडून त्या पद्धतीने कारवाई होताना दिसत नाही. असे अनेक अवैध धंदे करणाऱ्यांमुळे नागरिक व्यसनाधीन होत चालले आहे. पेठ बीड पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये अवैध गुटक्याचे अड्डे हे हनुमंत उगले ला माहित आहेत हनुमंत उगले हा पोलीस कर्मचारी माफी यांच्या संपर्कात असल्यामुळे अनेक पोलीस स्टेशनचे कर्मचारीही त्याच्या वसुली वरती नाराज आहेत कारण स्वतःच्या बीटमध्ये हनुमंत उगले न थांबता दुसऱ्याच्याही बीटमध्ये जाऊन वसुली करतो दुसऱ्या बीट अंमलदाराला हनुमंत उगलेची अरेरावीची भाषा होत असताना हनुमंत उगले नेमका कोणाच्या आशीर्वादाने आणि पाठिंब्याने दुसऱ्या बीट मधील जेष्ठ पोलीस अधिकारी कर्मचारी यांना अरेरावेची भाषा वापरतो व दुसऱ्याच्या बीट मध्ये जाऊन बीड शहरातील पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील सर्व वसुली हनुमान उगलेच मुळ अनेक पोलीस कर्मचारी नाराजीचा सूर पोलीस निरीक्षक यांच्याकडे व्यक्त करत आहेत. परंतु पोलीस निरीक्षक अशोक मंदिराचे त्यांना गाडीची ही किंमत देत नाहीत त्यामुळे हनुमंत उगले ची दादागिरी पेठ बीड पोलिसांसह नागरिकांच्या डोकेदुखी ठरलेली आहे. त्यामुळे स्वतः पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब यांनी पेठ बीड पोलीस स्टेशनकडे विशेष लक्ष देऊन अवैध धंदे मोडीत काढून पेठ बीड पोलीस स्टेशन हद्दीत माफियांकडून लाखोंची उलाढाल करणाऱ्या संबंधित पोलीस कर्मचारी हनुमंत उगलेंवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# रामेवाडीत दोन एक्करात करडी बहरली

## भेसळयुक्त तेलांना वैतागून शेतकरी प्रभाकर पौळ यांनी घेतले करडीचे पिक

परळी : रब्बी हंगामात घेतले जाणारे करडी हे पिक व त्या पासुन काढले जाणारे तेल आरोग्यास खुप फायदेशीर आहे. आजच्या युगात केवळ नगद पैसा देणाऱ्या पिकाचीच लागवड व उत्पादन शेतकरी घेतांना दिसत आहेत. ऊस,कापुस, सोयाबीन ह्या पिकांवर शेतकऱ्यांचा अधिक भर आहे .मानवी आरोग्यास फायदेशीर असणारे करडी पिकाचा पेरा वीस वर्षाच्या काळात खुपच कमी झाला आहे. करडी पेरा/उत्पादन कमी झाल्याने बाजारपेठेतील भेसळयुक्त तेल खावे लागत आहे. ह्या भेसळयुक्त तेलाचे आरोग्यावर खुप गंभीर परिणाम दिसुन येत आहेत.पैशाच्या हव्यासा पोटी आरोग्यास आपण मुकलो,एकेकाळी घाण्यावरती करडीचे शुद्ध तेल काढले जायचे आणि तेच तेल अन्नात वापरले जायचे या मुळे माणूस दीर्घकाळ निरोगी आयुष्य जगत असे, आता बाजार पेठेत किती भेसळयुक्त तेल आहे याच्या काही मर्यादाच नाहीत. रिफाईंड ऑईल च्या नावाखाली जणू विष विक्री केले जात आहे .भेसळयुक्त तेलाचे परिणाम म्हणजे वाढते हृदय विकाराचे प्रमाण होय. कुटुंबाला शुद्ध तेल मिळावे यासाठी परळी तालुक्यातील रामेवाडी /कासारवाडी येथील शेतकरी प्रभाकर रुस्तुमराव पौळ यांनी एक अर्धा नाही तर सुमारे दोन एक्कर एवढ्या शेती क्षेत्रात करडीची पेरणी केली आहे . रब्बी हंगाम घेतले जाणारे हे पिक आता बहरले आहे. पैसा कमवण्याच्या हेतूने हे पिक घेतले नसुन केवळ शुद्ध तेल कुटुंबाला मिळावे ऐवढ्याच हेतूने दोन एक्कराची करडीची शेती केली असल्याचे शेतकरी प्रभाकर पौळ यांनी म्हटले आहे . त्यांनी म्हटले आहे कि,साधारणपणे वीस/पंचवीस वर्षांपेक्षा अधिक कालावधीनंतर आमच्या शेतात दोन एकर करडई पेरली आहे .करडीची पेरणी बंद होण्याचं मुख्य कारण सांगतांना ते म्हणाले कि, तिला असलेली काटेरी फुला मुळे रोजंदारीवरील महिला आणि सालगडीही ही करडी काढायला नकार देऊ लागले.करडी कापायची,ती वाळवून काठीने बडवायची.मग ती उधळून करडी आणि काटेरी कस्पट बाजुला करायचं,हे सगळं कठीण काम एकेकाळी व्हायचं,तेलघाण्यात करडीचं तेल काढलं जायचं,तेच तेल वर्षभर घरी वापरलं जायचं,करडीची पेंड जनावरांना पौष्टिक खाद्य म्हणून दिलं जायचं.घाण्यावर करडी सह शेंगदाणा आणि कारळाचं तेलही काढलं जायचं.कारळाचं तेल सगळ्यात कमी निघायचं पण ते सगळ्यात चवदार असायचे, असे आई वडील सांगत असत. हळूहळू सगळ्याच तेलबिया बंद झाल्या. घाण्याचं तेल बंद झालं, तेलाची बंद पाकिटं घरी आली,अगदी करडी,शेंगदाणा, सुर्यफुल, सोयाबीन अशी नावं असलेली तेल पाकीटं बाजारात उपलब्ध आहेत.पण पाकिटावर जे नाव लिहिलयं,तेच




### करडीच्या तेलाचे आरोग्यास फायदे असे आहेत

हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत करते, मधुमेह टाळण्यास मदत करते, त्वचेची काळजी देते, केसांची निगा राखते, रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करते, पीएमएस लक्षणे दूर करण्यास मदत करते, रक्त परिसंचरण सुधारते, रेचक म्हणून कार्य करते. , घामाने कचरा काढून टाकण्यास मदत करते, वेदना कमी करते .

तेल त्यात असेल याची हमी भारतात तरी कोणीच देऊ शकत नाही. भेसळ हा इथल्या व्यवसायाचा पाया आहे.तेलात केवळ तेलाचीच भेसळ होत नाही तर विविध रसायने व कृत्रिम सुगंध मिसळतात,हे तपासून कोण बघणार? बंद पाकीट घेतलं की झालं!

पण गेल्या पाच–सहा वर्षांत खाद्यतेलातील भेसळीचं गांभीर्य बऱ्याच लोकांच्या लक्षात आलयं.छोटे छोटे तेलघाणे नव्याने सुरू झालेत.तेलबिया स्वत: विकत घेऊन,या घाण्यावर समोर उभा टाकून तेल काढून घेणाऱ्यांचं प्रमाण वाढलयं.हे तेल बाजारातील बंद पाकीटपेक्षा बरचं महाग पडतं.मात्र तब्येतीसाठी लोक एवढी किमत मोजताहेत.गेल्या दोन वर्षांत रब्बीला करडी पेरण्याचं प्रमाण लक्षणीय वाढलयं. महत्त्वाचं म्हणजे करडीची रास करणारी मशीन देखील आली आहे .हार्वेस्टर म्हणतात त्याला.त्यामुळं माणसांनी काटेरी करडी काढण्याचा प्रश्नच उरला नाही.रास झाल्यानंतरच व्यावसायिक पिक म्हणून ती किती परवडते ते लक्षात येईल. मात्र आम्ही हे पिक पैशासाठी घेतले नसुन आम्हाला वर्षभर शुध्द तेल निघण्या इतपत करडीचं उत्पादन होईल.

### आता दरवर्षी शुध्द तेलासाठी करडी पेरणार आहोत असेही पौळ यांनी म्हटले आहे.

रसायने व कृत्रिम सुगंध युक्त तेलांची विक्री –शेतकरी प्रभाकर पौळ

अगदी करडी,शेंगदाणा, सुर्यफुल, सोयाबीन अशी नावं असलेली तेल पाकीटं बाजारात उपलब्ध आहेत.पण पाकिटावर जे नाव लिहिलयं,तेच तेल त्यात असेल याची हमी भारतात तरी कोणीच देऊ शकत नाही. भेसळ हा इथल्या व्यवसायाचा पाया आहे.तेलात केवळ तेलाचीच भेसळ होत नाही तर विविध रसायने व कृत्रिम सुगंध मिसळतात,हे तपासून कोण बघणार? बंद पाकीट घेतलं की झालं!पण गेल्या पाच–सहा वर्षांत खाद्यतेलातील भेसळीचं गांभीर्य बऱ्याच लोकांच्या लक्षात आलयं.छोटे छोटे तेलघाणे नव्याने सुरू झालेत.तेलबिया स्वत: विकत घेऊन,या घाण्यावर समोर उभा टाकून तेल काढून घेणाऱ्यांचं प्रमाण वाढल आहे.

### साखरेचे नियंत्रण

करडईच्या तेलामध्ये असंतृप्त फॅटी ऍसिड नावाचे आरोग्यदायी चरबी असतात. मध्यम प्रमाणात सेवन केल्यास, ते रक्तातील साखरेचे नियंत्रण, हृदयाचे चांगले आरोग्य आणि जळजळ कमी करणे यासारखे आरोग्य फायदे देऊ शकते . कोरड्या त्वचेवर उपचार करण्यासाठी लोक त्याचा वापर करू शकतात आणि उच्च तापमानात स्वयंपाक करताना वापरणे सुरक्षित आहे.

# आ.सुरेश धस यांचा आदेश, अन प्रशासन गावच्या पारावर...

## शेतकऱ्यांकडून समाधान आणि आभार व्यक्त.. आष्टी प्रतिनिधी , आष्टी , पाटोदा, शिरूर, मतदार

संघातील शेतकरी बांधवांच्या समस्या सोडवण्यासाठी तसेच ग्रामपंचायत स्तरीय विशेष मदत शिबिरे आयोजित करण्याच्या प्रशासनाला दमदार आमदार मा.सुरेश धस यांनी आदेश देताच आष्टी तालुक्यातील तहसीलदार,तालुका कृषी अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना दिलेल्या सुचनेनुसार पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना,केंद्र शासन व नमो किसान सन्मान योजनेतील अपात्रते संबंधी असणाऱ्या त्रुटी दूर करण्यासाठी प्रशासनाकडून गावोगावी नेमून दिलेल्या तारखांना गावच्या पारावर शिबीरे घेतली जात आहेत.

विधानसभा निवडणुकीमध्ये भरघोस मताधिक्य घेऊन निवडून आलेल्या आणि सर्वसामान्य जनतेच्या विश्वासाला पात्र ठरलेल्या आ.सुरेश धस यांनी मतदारसंघातील विकास कामासह प्रशासनातील सर्वसामान्याला येणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी प्रशासनातील



सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी गावोगावी पारावर जाऊन सोडवाव्यात असे आदेश दिल्याने गावातील पारावर प्रशासनातील तहसीलदार वैशाली पाटील, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे व गटविकास अधिकारी सचिन सानप यांनी विशेष मदत शिबिरे घेऊन पी.एम.किसान लाभार्थ्यांची ई-केवायसी नसणे,लँड सिंडींग नसणे, लाभार्थी अनट्रेसेबल असणे व इतर अनुषंगिक बाबींची पूर्तता या कॅम्पच्या माध्यमातून अपात्रते संबंधित असणाऱ्या अडचणी सोडवल्या आहेत.आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघात प्रशासनामार्फत विशेष मदत शिबिरे दि.२० ते २४ जानेवारीपर्यंत राबवले जाणार असून या कालावधीत प्रशासन शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना,केंद्र शासन व नमो किसान सन्मान योजनेत अपात्र व या संदर्भात असणाऱ्या अडचणीचे निरसन करण्याचे काम करत आहे. या मदत शिबिरात शेतकऱ्यांचा देखील उत्स्फूर्त प्रतिसाद असून या अभिनव उपक्रमाचे शेतकऱ्यांकडून आमदार सुरेश धस यांनी गावोगावी आयोजित केलेल्या शिबिरांमध्ये समस्या सुटल्या बद्दल शेतकरी नागरिकांनी समाधान व्यक्त करून आमदार सुरेश धस यांचे आभार मानले आहेत.आभार मानले जात आहेत. दिलेल्या कालावधीमध्ये नमो किसान योजनेअंतर्गत वंचित असलेल्या शेतकऱ्यांनी या या ग्रामपंचायत स्तरीय विशेष मदत शिबिराचा लाभ घेण्याचे व आपल्या समस्या सोडण्याचे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले. चिखली येथे सामाजिक कार्यकर्ते गणेश शिंदे, शिवाजी आवारे, शांतीलाल घोलप,अंकुश आवारे, अंगत शिंदे यांच्यासह उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य,प्रमुख पदाधिकारी



# रॉयलस्टार संघ ठरला विजेता, तर डी.डी. संघ उपविजेता

प्रतिनिधी । गेवराई

गेवराई येथे बुधवार १ जानेवारी पासुन सुरु असलेल्या जयभवानी चषक क्रिकेट स्पर्धेतील अंतीम सामन्यात विजय मिळवत रॉयलस्टार संघाने जयभवानी चषक जिंकला. तर डी.डी. संघ हा उपविजेता ठरला. गेवराई येथील भगवती क्रिकेट क्लबच्यावतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेतील विजेता व उपविजेत्या संघास रविवार (१९ जानेवारी) रोजी दुपारी २ वाजता शिवराज पवार यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले.रॉयलस्टार क्रिकेट संघाने जयभवानी चषक पटकावला या प्रसंगी संघातील खेळाडू बक्षिस वितरणाच्या कार्यक्रमासाठी शिनु बेद्रे, माजी उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी, विलास गुंजाळ, सालम चाऊस, विनायक गिरी, समाधान मस्के, पिटु साळवे. दिपक मुददशीर, शेख काबंळे, कृष्णा अवघड, शेख नसिर, रजित पाटोळे, बालाजी जाधव, वाजेदान, शेख बाबा, राजेंद्र ताडिया, प्रदीप सुतार, आकाश सुतार, अशोक नाडे विजेता रॉयल स्टार संघांचे खेळाडू,शेख शाहेद,शम्मु मनियार,नईम बागवान,फैसल चाऊस,अतीक अतार,सय्यद अदीब,मोमिन हसीब,सलमान बडे, सय्यद अदनान, जफर मोमिन, उबेद काजी,गुड्डू मनियार, मुजाहेद बागवान, मोहसिन पठान,जमील भाई हे उपस्थित होते.

# लिंबागणेश येथील रोहित्रामध्ये बिघाड ; उच्चदाबाच्या वीजेमुळे घरगुती विद्युत उपकरणांचे नुकसान

## रिकाम्या खुर्चीला हार घालुन ग्रामस्थांनी निषेध व्यक्त केला :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश : बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील बसस्थानकावरील रोहित्राचा अचानक बिघाड झाल्याने अचानक उच्चदाबाच्या विजेमुळे अनेक घरातील घरगुती विद्युत उपकरणे जळुन ग्रामस्थांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. गावाला विद्युत पुरवठा करणाऱ्या तारा या झाडाझुडपातून आलेल्या असुन वारंवार तांत्रिक बिघाड होत असुन महावितरण कडुन योग्य देखभाल दुरुस्ती करण्यात येत नाही.गेल्या ३ महिन्यांपासून लिंबागणेश येथील सहाय्यक अभियंता पद गेल्या ३ महिन्यांपासून रिक्त असुन चौसाळा येथील सहाय्यक अभियंता अभिजित शिंदे यांच्याकडे अतिरिक्त पदभार देण्यात आलेला आहे. दीड महिन्यांपूर्वी रिक्त पद भरण्यात यावे यासाठी ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते.अखेर आज डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी श्रीफळ फोडून रिकाम्या खुर्चीला हार घालुन निषेध व्यक्त केला.यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, माजी सरपंच मंडलिक , विक्की आप्पा वाणी, संतोष वाणी,संतोष भोसले,



अशोक जाधव,संजय घोलप,रामकिसन गिरे,संजय सुकाळे, चंद्रकांत आवसरे, सर्जेराव मुळे, गणेश घाडगे, अनिल ढवळे , अशोक ढास आदि ग्रामस्थ उपस्थित होते.

बसस्थानक येथील रोहित्रामध्ये गेल्या आठवडाभरापासून बिघाड असल्याने शेतीला पाणी देणे तर दुरच पण जनावरांना पाणी पाजण्याची अडचण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची अडचण तातडीने दुर करावी. महावितरणच्या ढिसाळ कारभारामुळे ग्रामस्थ हैराण असुन त्याचा सर्वप्रथम मी निषेध करतो.विद्युत कर्मचारी मुख्यालयी रहात नाहीत त्यामुळे रात्री अपरात्री बिघाड झाल्यानंतर ग्रामस्थांनाच दुरुस्ती करावी लागते. तातडीने महावितरणने उपाययोजना न केल्यास तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा आम्ही महावितरणला देत आहोत.

### ३ महिन्यांपासून सहाय्यक अभियंता पद रिक्त असल्याने रिकाम्या खुर्चीला हार

लिंबागणेश येथील ३३ केव्ही केंद्रातील सहाय्यक अभियंता पद ३ महिन्यांपासून रिक्त आहे.दीड महिन्यांपूर्वी मांजरसुंभा ते पाटोदा राज्य मार्गावरील लिंबागणेश बसस्थानक येथे रास्तारोको आंदोलन करण्यात आले होते. तेव्हा तातडीने पदाची भरती करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. बसस्थानक येथील रोहित्रात बिघाड असल्याने घरामधील विद्युत उपकरणांमध्ये वीजप्रवाह उतरत आहे त्यामुळे भविष्यात जीवघेणा धोका उद्भवू शकतो याची गांभीर्याने दखल घ्यावी यासाठी आज रिकाम्या खुर्चीला हार घालुन निषेध व्यक्त केला.

# धारूर येथील सरस्वती प्राथमीक विद्यालयाची सहल सपन्न बाल विद्यार्थ्यांनी घेतला सहलीचा आनंद

धारूर / रोहित फावडे

सरस्वती प्राथमिक विद्यालय किल्ले धारुर या शाळेची शैक्षणिक सहल पंढरपूर, नृसिंहवाडी,कोल्हापूर,कण्हेरी मठ, महालक्ष्मी मंदिर,शाहुपॅलेश, ज्योतिबा मंदिर,व पन्हाळा किल्ला या ऐतिहासिक ठिकाणी गेली असता विद्यार्थ्यांनी सहलीचा मनमुराद आनंद घेतला.या सहलिमध्ये पन्हाळा किल्ल्याचा शिवकालीन इतिहास शाळेचे शिक्षक सहल प्रमुख विजय काळे व शाळेचा माजी विद्यार्थी वैभव जाधव यांनी सांगितला ,तसेच



कण्हेरी मठ मधील ग्रामीण जीवन,तारांगण ब्रम्हांडाची सखोल माहिती विद्यार्थ्यांनी आवडीने पाहिली संस्थेचे सचिव, मुख्याध्यापक जगदिश तोष्णीवाल , प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक तुकाराम डोंगरे , शिक्षक अशोक तळसकर , श्रीमती उषा मुंडे , श्रीमती ज्योती काळे या शिक्षकांनी सहलीमध्ये सहभाग नोंदवुन परिश्रम घेतले . या सहलिमध्ये ४७ विद्यार्थी व ६ शिक्षक सहभागी झाले होते. एसटी महामंडळाचे चालक सुधाकर साक्रूडकर यांनी सहल यशस्वी पार पाडण्यासाठी सहकार्य केले




धारूर / रोहित फावडे

महाराष्ट्रात संजय गांधी ही योजना असुन सदरील योजनेचे अनुदान १५००/- रुपये आहे.परंतु सदरील अनुदानामध्ये वाढ करणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे अनुदानामध्ये वाढ करुन ५०००/- रुपये करण्यात यावे तसेच प्रत्येक ग्रा.पं.मार्फत प्रत्येक दिव्यांग व्यक्तींना ५% निधी तात्काळ वाटप करण्यात यावा.व दिव्यांग व्यक्तींना व्यवसाय करण्यासाठी ग्रा.पं. मार्फत २०० चौरस फुट जागा तात्काळ उपलब्ध करुन द्यावी जेणेकरुन दिव्यांग व्यक्तींना जगण्याचा मार्ग लाभेल.

तरी मा.मुख्यमंत्री साहेबांनी वरील सर्व मुद्यांची तात्काळ दखल घ्यावी.अन्यथा प्रहार च्या वतीने उपविभागीय कार्यालय माजलगांव येथे २६ जानेवारी २०२५ रोजी सिट्टी मारो आंदोलन करण्याचा इशारा प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा सरचिटणीस हनुमंत तोंडे,प्रहारचे विष्णू चोले,प्रहारचे बापु सिरसट,प्रहारचे मधुकर चोले यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.



गेवराई :तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषी पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कॉफी मुक्त अभियानांतर्गत जनजागृती सप्ताहाच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय सचिव श्रीमती वैशाली जामदार, सहसचिव प्रियाराणी पाटील बीडचे उपशिक्षणाधिकारी हजारे यांनी भेट दिली असता त्यांचा सत्कार करताना प्राचार्य थिटे.ए. एस.

# माजलगाव पंचायत समितीच्या भ्रष्ट कारभारामुळे घरकुल दीड लाखाचे हातात पडतात एकच लाख

## ऑपरेटर मगरेची झुंडशाही / हुकूमशाही माजलगाव पंचायत समितीची इज्जत वेशीला

माजलगाव । सुनिल थोरात

माजलगाव तालुक्यातील घरकुल योजनेतील लाभार्थ्यांची अडवणूक करत चिरीमिरी साठी अडवणूक करणाऱ्या माजलगाव पंचायत समितीमधील गटविकास अधिकारी, घरकूल अभियंता, घरकुल ऑपरेटर मगरेची मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब चौकशी करतील का? याकडे तालुक्यातील जनतेचे लक्ष लागले असून आशा मगरूर कर्मचाऱ्यांना चौकशी अंती घरचा रस्ता दाखवतील का। गोरगरिबांस स्वतःचे घर असावे म्हणून ही महत्वकांक्षी योजना चालू केलेली असून या योजनेत अधिकारी व कर्मचारी खोडा घालत लाभार्थ्यांना घरकुलापासून वंचित त ठेवत आहेत. त्यामुळे अनेक लाभार्थना का गोष्टीचा मनस्ताप होत असून पंचायत समिती येथे चकरा माराव्या लागत आहेत परंतु पंचायत समिती माजलगाव येथील अधिकारी कर्मचाऱ्यांना गोरगरीब जनतेचे काही देणे घेणे राहिलेले नाही. स्वतःच्या फायद्यासाठी चिरीमिरी देणा-यांचे येथे कामे होतात. परंतु यामुळे खरे लाभार्थी वा योजनेपासून वंचित ठेवले जात असल्याने त्यांना न्याय मिळत नसल्याने पंचायत समिती माजलगाव येथील संबंधित अधिकाऱ्यांची व व कर्मचाऱ्यांची मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब सखोल चौकशी करून कारवाई करत बडतर्फ करतील का? व आशा कामात कसूर करणाच्या कर्मचाऱ्यांना घरचा वा रस्ता दाखवतील का? या कडे सबंध तालुक्यातील जनतेचे लक्ष लागलेले आहे. माजलगाच पंचायत समिती घरकूल विभागात कार्यरत असलेले गटविकास अधिकारी यांच्याकडून घरकुल सारख्या महत्त्वकांविषयी योजनेत खोडा घालून बदनाम करण्याचे काम अनेक दिवसातून बिनबोभाटपणे चालु आहे. लाभार्थ्यांना घरकूल रेखांकन दिल्यानंतर ६/६ महिने अभियंता लाभार्थ्याकडे फिरकत नाही. लाभार्थ्यांना जरी भेटी दिल्या तरी

त्यांच्याकडून चिरीमिरी घेतल्याशिवाय हप्ते टाकले जात जात नाहीत. त्यामुळे आज ही हजारो लाभार्थी हक्काच्या घरकुलापासून वंचित राहत आहेत, प्रत्येक गावातील लाभार्थी वर्गात प्रचंड असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. ज्या लाभार्थ्यांनी घरकुल अभियंत्यांना लक्ष्मी दर्शन न दिल्यास सध्या बजेट नाही म्हणून वेळ निभावून नेतात. सर्वसाधारणपणे दीड लाखाच्या रकमेत प्रत्यक्षात घरकुल अभियंता, अधिकारी, ऑपरेटर यांना पैसे वाटप करून प्रत्यक्षात एक लाख रुपये शिल्लक राहतात. त्यातून घर कसे बांधायचे असा प्रश्न निर्माण झाल्याने घर बांधणीची लाभार्थ्यांची इच्छा राहत नाही लाभ देत असताना अभियंत्याकडून पात्र, गरजू लाभार्थ्यांना वंचित ठेवण्याचा प्रकार मोठ्या प्रमाणावर झाला असल्याचे स्पष्ट होते. ऑपरेटर मगरेची झुंडशाही हुकुमशाही माजलगाव पंचायत समितीची इज्जत वेशीला टांगली. घरकुल ऑपरेटर लाभारथ्यांकडून पैसे घेतल्याशिवाय कोणाचेच हप्ते काढले जात नाहीत, गेल्या तब्बल १५ वर्षातून अधिक काळापासून एका ठिकाणी ठाण मांडून

बसल्याने त्यांची हिंमत वाढली आहे. गटविकास अधिकारी माजलगाव या मगरेच्या काळया कारनाम्याला पाठीशी घालत असल्याने त्याची हिंमत वाढत चालली आहे त्यामुळे लाभार्थ्यांना नाहक त्रासाला सामोर जावे लागत आहे. माझे कोणीच वाकडे कडे करू शकत नाही कोणी कमी जास्त केल तर खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देतो तरी या तक्रारीची गंभीर दखल घेऊन संबंधिताची सखोल चौकशी करून यांना तात्काळ सेवेतून बडतर्फ करण्यात यावे अशी भावना तालुक्यातील जनतेन मधून निर्माण झाली आहे. घरकुलधारकांना न्याय मिळावा यासाठी दि. २३/ रोजी जिल्हा कार्यालया समोर लोकशाही मार्गाने बेमुदत आमरण उपोषण करण्यात येणार आहे असे नईम आतार, सोमेश्वर जाजू यांनी प्रसारमाध्यमांगी बोलताना सांगितले आहे.

# लाखोंच्या संख्येने एकच वारी २५ जानेवारी चलो अंतरवली !

## मनोज जरांगे पाटील समर्थक रोहन गलांडे यांचे आव्हान!

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील सकल मराठा समाज बांधवांनी आपल्या मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार सांगावा आलाय यायलाच लागतंय सामुहिक आमरण उपोषण दि.२५ जानेवारी २०२५ रोजी सामुहिक अमरण उपोषणाला लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मनोज जरांगे पाटील समर्थक , अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.तरी मराठा समाजाला




आरक्षण मिळावे यासाठी दीड ते दोन वर्ष झाले मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील व सकल मराठा समाज बांधव जिवाचे रान करुन झगडत आहे तरी सुद्धा सकल मराठा समाज बांधवांना सरसगट ओबीसी मधुन आरक्षण मिळाले नाही म्हणून येणाऱ्या २५ जानेवारीला मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार आपल्या मुलांना न्याय मिळवून देण्यासाठी लाखोंच्या संख्येने सामुहिक अमरण उपोषणाला बसण्यासाठी अंतरवली सराटी येथे सकल मराठा समाज बांधवांनी उपस्थित रहावे असे जरांगे पाटील समर्थक रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

# घरकुल योजनेचे नवीन अर्ज सुरु

## मुख्याधिकारी निता अंधारे यांचे ऑनलाइन अर्ज भरण्याचे आवाहन

आवश्यक कागदपत्रे

१) अर्जदाराचे आधार कार्ड (मोबाईल नंबर लिंक असलेले), २) अर्जदार यांचे कुटुंबातील सर्व सदस्यांचे आधार कार्ड (पती / पत्नी व मुले), ३) उत्पन्नाचे चालू वर्षाचे प्रमाणपत्र (तहसिलदार यांचे), ४) जात प्रमाणपत्र ५) राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक (आधार लिंक असलेले), ६) जागेचा पुरावे (पी.टी.आर, पी. आर. कार्ड, ७/१२ किंवा खरेदीखत), ७) अर्जदार यांचे आई व वडिलांचे आधारकार्ड (हयात नसल्यास मृत्यू प्रमाणपत्र), ८) पी. एम. स्वनिधी, इमारत बांधकाम कामगार, पी.एम. विश्वकर्मा इ. योजनेचा लाभार्थी असल्यास नोंदणी प्रत आवश्यक आहे.

बीड ।प्रतिनिधी

प्रधानमंत्री आवास योजना २.० सुरुवात झाली असून, नगरपरिषद बीड हद्दीतील निकषात बसणाऱ्या नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन प्रशासक तथा मुख्याधिकारी निता अंधारे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात केले आहे. गरिबांचे घराचे स्वप्न साकार व्हावे यासाठी शासनाकडून राबविण्यात येत असलेली प्रधानमंत्री आवास योजनेचा शहरी २.० टप्पा सुरू झाला आहे. यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. यासाठी पात्रतेचे निकष याप्रमाणे असून, भारतामध्ये अर्जदाराचे तसेच कुटूंबामधील इतर सदस्यांच्या नावे पक्के घर नसावे, अर्जदाराने मागील २० वर्षात कोणत्याही शासकीय घरकुल योजनेचा

लाभघेतलेला नसावा, अर्जदार हा आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील असावा, अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न मर्यादा ४ लाख ५० हजार कमाल राहील, योजनेअंतर्गत बांधण्यात येणारी घरे कुटूंबातील कर्त्या महिलेच्या किंवा पुरुष व महिला यांच्या संयुक्त नावावर असतील, पती, पत्नी सह अविवाहित मुलांचा समावेश असावा, आधार लिंक असलेले स्वतःचे बँक खाते असावा, एस.सी.



एसटी, ओबीसी यांच्यासाठी जातप्रमाणपत्र आवश्यक आहे. या निकषात बसणाऱ्या नागरिकांनी ऑनलाईन पद्धतीने हीींिः ग्रिळी.र्सी.ळप झच्- धचखड२० २४/झारू ऊशर्षीश्री.री यिथे अर्ज भरावेत असे आवाहन बीड नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी निता अंधारे यांनी केले आहे.

# एसपी नवनीत कॉवतानी पोलीस तेजेस वाव्हूळेचे कौतुक

## सुट्टीवर असलेल्या तेजस वाहुळे या पोलीसाची धडाकेबाज कारवाई रजेवर असतांना बजावले कर्तव्य. पोलीस अधीक्षकांकडुन कौतुक

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे नवीन एस पी नवनीत कावत यांच्या कार्यकाळामध्ये अनेक गुन्हेगारांना आता चपराक बसत आहे बीड जिल्हा पोलीस पाटील अनेक इमानदार पोलीस कर्मचारी इमाने याद्वारे काम करत असताना नवनीत काम सारखे अधिकाऱ्यामुळे आज त्यांच्या जीवनामध्ये आनंद व्यक्त होत आहे नोकरी करत असताना चांगला अधिकारी मिळाल्यानंतर पोलीस प्रशासनात चांगलं काम करणारे अनेक पोलीस अधिकारी कर्मचारी आहेत याचाच एक भाग म्हणून बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये रजेवर असलेले तेजस वावळे या पोलीस कर्मचाऱ्यांनी आपले कर्तव्य पार पाडत असताना मोबाईल चोरट्यांना मुलगी हात पकडले त्यामुळे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याकडून कौतुकाची थाप मिळालेली आहे

आज दिनांक २१/०१/२०२५ रोजी पोलीस मुख्यालय बीड येथे नेमणुकीस असलेले पोलीस अंमलदार ब.नं. ४९३ तेजस वाहुळे हे साप्ताहीक सुटी असल्याने अंबाजोगई येथे घरी गेले होते. घरी असतांना दुपारी ०३:०० वाजेच्या सुमारास त्यांच्या मुलाला शाळेतुन घेण्यासाठी गेले होते. शाळा सुटण्यास वेळ असल्याने तेजस वाहुळे हे बस स्थानक अंबाजोगई येथे थांबलेले होते. त्यादरम्यान बसस्टॅन्डवर एक बस आल्यानंतर एक इसम बसमध्ये चढणाऱ्या गर्दीचा हिस्सा झाला. परंतु तो गाडीत न चढता परत माघारी फिरुन बाहेर जातांना दिसला. त्यावेळी तेजस वाहुळ यांनी सदर संशयीताने पाकीट मारले असावे असा संशय आल्याने तो कोठे जातो यासाठी पायी पाठलाग केला. त्यावेळी सदरचा इसम हा बस स्टॅन्डच्या बाहेर निघुन गेला. सदर इसमाचे दोन साथीदार सुद्धा त्याला बस स्टॅन्ड परीसरातुन बाहेर उभ्या असलेल्या एका चारचाकीजवळ एकत्र मिळाले. ते सर्व मिळुन चारचाकी वाहनात बसुन घाईत निघाले त्यामुळे पोलीस अंमलदार तेजस वाहुळे यांचा संशय अधिकच बळावला. तेव्हा त्यांनी मोटारसायकल





आणण्यासाठी वेळ न घालवता मागुन आलेल्या रिक्षात बसुन सदर चारचाकी वाहनाचा पाठलाग केला. सदर चारचाकी ही भगवानबाबा चौकातील सीएनजी पंपावर थांबली. त्यावेळी पोलीस अंमलदार तेजस वाहुळे यांनी घाई न करता सदर वाहनात किती लोक आहेत याचा अंदाज घेतला असता सदर वाहनातुन ४ इसम खाली उतरले. त्यावेळी तेजस वाहुळे यांनी जवळ जावुन त्यातील मुख्य संशयीतास पकडुन त्यास आपण पोलीस असल्याचे सांगुन बस स्टॅन्डवर काय केले? अशी विचारणा केली असता त्याने मोबाईल चोरी केल्याचे सांगीतले. त्यावेळी तेजस वाहुळे यांनी पोलीसी खाक्या दाखवीला असता त्याचे इतर ३ साथीदार सदर ठिकाणावरुन पळुन गेले. तेजस वाहुळे यांना चारचाकी चालवता येत नसल्याने त्यांनी संशयीतास त्याच्या वाहनाने पोलीस स्टेशनला चालण्यास सांगीतले. तेव्हा संशीयत पोलीस स्टेशनला चलण्यास टाळाटाळ करु लागला तेव्हा तेजस वाहुळे यांना आणखी संशय आल्याने त्यांनी सदर वाहनाची झडती घेतली असता त्यांना सदर वाहनात एकुण ६३ मोबाईल मिळुन आले. तेजस वाहुळे यांनी क्षणाचाही विलंब न करता पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत साहेब यांना फोन करुन घडलेली घटना सांगुन तात्काळ मदत पाठवीण्याबाबत विनंती केली. तेव्हा पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांनी त्यांना तेथेच थांबुन राहण्याच्या सुचना देवुन त्यांच्या मदतीसाठी तात्काळ अंबाजोगई शहर पोलीस स्टेशनचे अंमलदार पाठवीले.

संशयीत आरोपीस पोलीस स्टेशन येथे नेवुन त्याचे नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव जगु रामजी खडसे वय-३६ वर्षे रा. लांझाडा पोस्ट डोडम ता. कुही जि. नागपुर ह.मु. प्लॉट नं. १३८ साईबाबा नगर दिघोरी, नागपुर असे सांगीतले. तो त्याचे पर राज्यातील साथीदारांसह विविध शहरात फिरुन चोऱ्या करीत असल्याचे कबुल केले आहे. तसेच तो त्याच्याकडे असलेल्या गाडीचा क्रमांक बदलुन सदर गाडी चोरी करण्यासाठी वापरत असतो. असे तपासात निष्पन्न झाले आहे. आरोपीच्या ताब्यातुन १४,४२,०००/ - रुपये किंमतीचे एकुण ६३ मोबाईल व ८,००,०००/- रुपये किंमतीची चारचाकी एक स्वीफ्ट कार बनावट क्रमांक एमएच ४९ सीडी-८०२४ असा असलेली जिचा मुळ क्रमांक एमएच-३१ एफयु-७५२८ असलेली असा एकुण २२,४२,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. अंबाजोगई शहर पोलीस मिळालेले मोबाईल व इतर ०३ आरोपींचा शोध घेत आहेत.

पोलीस अंमलदार तेजस वाहुळे यांनी दाखविलेल्या तत्परतेबद्दल व उत्कृष्ट कामगीरीबद्दल पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत (भा.पो.से.) यांनी त्यांचे अभिनंदन केले असुन उद्या दिनांक २२/०१/२०२५ रोजी पोलीस अंमलदार श्री. तेजस वाहुळे यांचा पोलीस अधीक्षक कार्यालयात पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत हे सत्कार करणार आहे.पोलीस अंमलदार तेजस वाहुळे यांनी दाखविलेल्या तत्परतेपासुन इतर अंमलदार यांनी प्रेरीत होवुन काम करावे व बीड जिल्हा पोलीस दलाचा नावलौकीक करावा असे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत (भा.पो.से.) यांनी सांगीतले आहे.



बीड जिल्हयाचे पालकमंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज मंत्रालयात उप मुख्यमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेऊन अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. बीड जिल्हयाच्या विकासासाठी संपूर्ण सहकार्य करण्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# बीड शहराला पश्चिमेकडून वळण रस्ता द्या आणि धुळे-सोलापूर महामार्गाची दुरुस्ती करा : मुळूक, गलधर

## बीडच्या रस्ते प्रश्नासंदर्भात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी सकारात्मक

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील मुख्य रस्त्यांच्या दुरुस्ती व नागरिकांच्या सुविधासंदर्भात शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक व स्वप्नील गलधर यांनी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन निवेदन दिले. बीड शहराच्या पश्चिम बाजूने (नगर रोड) जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गा ५६१ वर वळण रस्ता करावा अशी मागणी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केली तर शहरातून जाणाऱ्या सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गाची दुरुस्ती करुन सुविधा देण्यात याव्यात अशी मागणी जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनी निवेदनाद्वारे केली. यावेळी बीडच्या रस्त्यांच्या प्रश्नासंदर्भात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे मुळूक, गलधर यांनी सांगितले.

बीड शहरातून राष्ट्रीय महामार्ग ५६१ आणि सोलापूर-धुळे महामार्ग असे दोन महामार्गा गेले आहेत. यामुळे शहराच्या वैभवात पडली असली तर या रस्त्यांच्या कामात काही त्रुटी राहिल्या आहेत. या संदर्भात शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी



जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी शहराला वळण रस्त्याची गरज असल्याचे गडकरींच्या निदर्शनास आणून दिले. शहरातून पश्चिम बाजूने (नगर रोड) राष्ट्रीय महामार्ग ५६१ जातो. सध्या या रस्त्याचे रुंदीकरण करुन सिमेंट रस्ता बनविण्याचे काम सुरु आहे. हा रस्ता पुढे नगर, पुणे, मुंबईला जोडला जात असल्याने येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. परिणामी अपघाताचे प्रमाण वाढलेआहे. यामुळे शहराच्या पश्चिम बाजूने जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ५६१ वर वळण रस्ता करावा, अशी मागणी मुळूक यांनी केली. यामुळे नगर, पुणे, मुंबईकडे जाणारी वाहतूक शहराबाहेरुन जाईल आणि शहरातील वाहतुकीचा प्रश्न सुटेल असेही त्यांनी म्हटले आहे.

जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनी गडकरींसमोर सोलापूर- धुळे राष्ट्रीय महामार्गावरी त्रुटी निदर्शनास आणून दिल्या. बीड शहरातून जाणाऱ्या धुळे-सोलापूर महामार्ग (छक-५२) ची स्थिती अत्यंत दयनीय झाली आहे. रस्त्यावरील खड्डे, तुटलेल्या दिशादर्शक फलक, रस्त्यांच्या किनाऱ्यावरील भागाची दुरावस्था, तसेच शौचालय व साफसफाईच्या अभावामुळे प्रवाशांना गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या कारणाने अपघातांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. शहराजवळील महालक्ष्मी चौक ते छ. संभाजी महाराज चौक या मार्गावर शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र सर्व्हिस रोडची गरज अधोरेखित करण्यात आली आहे. पाली जवळील राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२ वरील विश्रांतीस्थळ लवकरात लवकर विकसित करून नागरिकांसाठी कार्यान्वित करण्याची मागणी गलधर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. बीडच्या रस्ता प्रश्नासंदर्भात गंभीर दखल घेऊन कंत्राटदारावर कारवाई करावी आणि रस्त्यांची देखभाल-दुरुस्ती व नवीन सुविधा लवकरात लवकर उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी मुळूक, गलधर यांनी केली आहे.



# बनावट चलनी नोटांमध्ये मनिष क्षीरसागर यास अटक

आठवले गँगचा सहभाग निश्चित.

बीड शहर पोलिसांची कामगीरी.

आठवले गँग सोबत सावलीसारखा राहणारा मनीष क्षिरसागर यांच्या घरामध्ये तीन महिन्यापूर्वी बनावट चलनी नोटांचा कारखाना मिळून आला होता. यामध्ये बीड शहर पोलिसांनी उत्कृष्ट कामगिरी बजावत यातील प्रिंटर, बनावट चलनी नोटा, आणि सहभागी प्रमुख आरोपी तात्काळ अटक केली होते. परंतु यातील प्रमुख आरोपी मनिष क्षीरसागर हा पोलिसांना तेव्हापासून गुंगारा देत होता. परंतु बार्शी नाक्यावरील डोंगरे कुटुंबावरील खुनी हल्ल्यामध्ये पुन्हा मनीष क्षीरसागर याचा सहभाग निश्चित झाला आणि स्थानिक गुन्हे शाखेने त्याला पुणे येथून उचलले.

परंतु पुणे येथे अशा प्रकारच्या बनावट चलनी नोटांमध्ये सहभागी असलेल्या मनीष क्षीरसागर याच्यासोबत अक्षय आठवले आणि ओंकार सवाई हे सुद्धा सोबत मिळून आले होते. तेव्हाच बीड शहर पोलिसांनी बनावट चलनी नोटांच्या गुन्हे तपासा संदर्भात सावध होऊन त्या दिशेने तपास करण्यात सुरुवात केली होती.

यावरून आयत्या तावडीत सापडलेल्या मणिष क्षीरसागर याचा कोर्टामार्फत बीड शहर पोलिसांनी जेलमधून त्यांचा ताबा घेतला. पोलिसांच्या तावडीत सापडल्यावर मनीष क्षीरसागर याने पोलिसांना सर्व माहिती दिली. अक्षय आठवले यांनी बनावट चलनी नोटा चलनात आणण्यासाठी पुणे येथे असलेल्या प्रविण गायकवाड यास पिस्टल पुरवले होते. तसेच पळून जाताना मनीष क्षीरसागर याला सोबत घेऊन जाऊन औरंगाबाद येथे लपवले होते. तसेच सनी आठवले यांनी सुद्धा यातील आरोपींना शरण देऊन अक्षय आठवले मार्फत संरक्षण पुरवले होते. या काका पोलिसांना गुन्ह्यात वापरलेला मनीष क्षीरसागर याचा मोबाईल मिळाला आहे. या माध्यमातून आणखी पुरावे या गँगच्या विरुद्ध पोलिसांना मिळणार आहे.

या संपूर्ण प्रकरणांमध्ये पोलीस अधीक्षक श्री नवनीत कांवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वंबर गोलड्ये यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ , सहायक पोलिस निरीक्षक बाबा राठोड, पोलीस अंमलदार बाळासाहेब शिरसाट, जयसिंग वायकर, मनोज परजणे, सुषेंन पवार, सचिन अलगट, यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे.

# हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त बीड जिल्ह्यात विविध ठिकाणी सामाजिक उपक्रम-शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते

हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त बीड जिल्ह्यामध्ये विवीध ठिकाणी सामाजिक उपक्रम राबवून जयंती साजरी करण्यात येत आहे आसे जिल्हा प्रमुख परमेश्वर सातपुते यांनी सांगितले आहे..शिवसेना पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाने व युवासेना प्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब,शिवसेना नेते तथा शिवसेना सचिव विनायकजी राऊत साहेब,शिवसेना नेते सुनीलजी प्रभू साहेब, शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब, शिवसेनेचे मराठवाडा समन्वयक विश्वनाथजी नेरूळकर साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब,सह संपर्कप्रमुख बदामराव आबा पंडीत साहेब,सह संपर्कप्रमुख डॉ.लक्षराज सानप साहेब,सह संपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यात आष्टी व माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये विविध समाज उपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक २३/१/२०२५ रोजी सकाळी ठीक दहा वाजता शिवसेना जनसंपर्क कार्यालय बार्शी रोड बीड येथे हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून सर्व पदाधिकारी व शिवसैनिक त्यांना मानवंदना करतील व यानंतर ँ/वडवणी येथील आनंद कॉम्प्लेक्स संभाजी महाराज चौक या ठिकाणी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करून, वडवणी तालुका प्रमुख विनायक बप्पा मुळे यांच्या आयोजना खाली ऊसतोड कामगार भगिनींना साडी वाटप, विविध प्राथमिक आरोग्य केंद्र येथे रुग्णांना फळ वाटप, विविध ठिकाणी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात येणार आहे..

ँ/उपजिल्हाप्रमुख आजिनाथजी खेडकर व शिरूर तालुका प्रमुख सोपान काका मोरे यांच्या आयोजित शिरूर येथे रांगोळी स्पर्धा व गोरगरीब महिलांचा हळदी कुंकवाचा कार्यक्रम घेऊन साड्या वाटप करण्यात येणार



आहेत.

ँ/ पाटोदा उपतालुकाप्रमुख अशोक तात्या पवार यांच्या आयोजित तालुका पाटोदा आंबेवाडी व हांडेवाडी गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये सकाळी अकरा वाजता शालेय साहित्य वाटप होणार आहे.

ँ/ आष्टी तालुका प्रमुख सुभाषजी राऊत यांच्या आयोजित आष्टी येथे मुख व बधिर वस्तीगृहामधील सर्व विद्यार्थ्यांना सकाळी ११:३० वाजता अल्पउपहार देण्यात येणार आहे.

ँ/ युवासेना माजलगाव जिल्हा युवाधिकारी प्रदीपजी तांबे यांच्या आयोजित माजलगाव येथील शासकीय रुग्णालयात रुग्णांना सकाळी ११ वाजता फळ वाटप.

ँ/ धारूर तालुका प्रमुख बाबा सराफ यांच्या आयोजित धारूर येथील शासकीय रुग्णालयात सकाळी ११:३० वाजता रुग्णांना फळ वाटप करण्यात येणार आहे.

ँ/ युवासेना वडवणी तालुका युवाधिकारी नवनाथजी मोरे यांच्या आयोजित वडवणी मोरेवाडी गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वही पेन वाटप करण्यात येणार आहे.

ँ/ शिवसेना जिल्हा संघटक रतन तात्या गुजर व शिक्षकसेनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बहिरवाळ सर यांच्या आयोजित बीड शहरातील भगवान विद्यालय शेजारी ध्येयपूर्ती गुरुकुल येथे २० तारखेपासून सुरू असलेल्या वक्तृत्व स्पर्धा, रनिंग स्पर्धा, चित्रकला स्पर्धा,अशा अनेक स्पर्धांचे बक्षीस उद्या दिनांक २३ रोजी सायंकाळी ७ वाजता वितरण करून सर्व विद्यार्थ्यांना जेवणाची व्यवस्था केली आहे.

याबरोबरच बीड जिल्ह्यातील व आष्टी माजलगाव विधानसभा मतदारसंघातील विविध ठिकाणी समाज उपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे,या सर्व कार्यक्रमाला शिवसेना,युवा सेना महिला आघाडी,किसान सेना,शिक्षक सेना सह सर्व अंगिकृत संघटनांच्या आजी-माजी पदाधिकारी व शिवसैनिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी केले आहे..!!

# वैराग्य मुर्ती राष्ट्रसंत वामनभाऊ महाराज

## वैराग्य मुर्ती राष्ट्रसंत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त हा लेख त्यांच्या चरणी अर्पण.

संतश्रेष्ठवामनभाऊ महाराज(जन्म-१ जानेवारी,इ.स. १८९१मृत्यू-२४ जानेवारी१९७६,)हेमहाराष्ट्रातीलएक प्रसिद्ध मराठी संत आणिकीर्तनकारहोते. संत वामनभाऊ महाराज हे एक अवतारी सिद्धपुरुष, साक्षात्कारी संत होते. त्यांनी आपले संपूर्ण जीवन वारकरी सांप्रदायाला समर्पित केले होते. वामनभाऊ महाराज यांनी अध्यात्मातून अठरा पगड जातींच्या लोकांमध्ये चांगल्या विचारांची पेरणी केली. त्यांनी माणसाला माणूस म्हणून जगण्याचे शिकविले आणि चालू असलेल्या अनिष्ट रूढी, चुकीच्या परंपरा व अंधश्रद्धा बंद करण्याचा उपदेश केला. भाऊंना प्रत्यक्ष पाहिलेले, त्यांचे अनुभव घेतलेले असंख्य लोक आजही हयात आहेत, त्यांचा शिष्यगण, त्यांनी घडवलेले अनेक कीर्तनकार, टाळकरी, वारकरी, भक्तमंडळी श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड येथे या महात्म्याच्या पुण्यतिथीला न चुकता हजेरी लावतात. त्याचबरोबर राजकीय, सामाजिक व सर्व क्षेत्रातील लाखो,आबालवृद्ध भक्त येथे 'भाऊंच्या' समाधीच्या दर्शनाला येतात.

माता राहीबाई भाग्याची खाण ।
पिता तोलाजी हा पुण्यवान ।।
पुत्र जन्माला रत्नासमान ।
तयासी शोभे नाव वामन ।।

या त्यांच्या आरतीतील शब्दात आई वडील यांची किर्ती समावली आहे.भाऊंच्या मुळ इतिहास पाहता

फुलसांगवी, ता.शिरूर (कासार), जि. बीड येथील तोलाजी ग्यानबा सोनावणे व बोरगाव (चकला) ता. गेवराई जि. बीडचे विठोबा राख यांच्या कन्या राहीबाई यांचा विवाह झाला. वंजारी समाजातील या पुण्यवान माता-पित्याच्या पोटी सदगुरू संत वामनभाऊ महाराज यांनीं जन्म घेतला. त्यांना जेष्ठ बंधू नारायन हे होते. माता राहीबाई या जुन्या प्रथेप्रमाणे बाळंतपणासाठी माहेरी बोरगावला गेल्या होत्या. सन १८९१ साली श्रावण शुद्ध सोमवारी सूर्योदय समयी त्यांनी या रत्नाला जन्म दिला. नाव ठेवले, वामन. 'भाऊ' हे भगवान शंकराचा अवतार मानले जातात. माता राहीबाई यांच्या पोटी प्रत्यक्ष देवाने जन्म घेतला. हे त्याचे भाग्य थोर असले तरी. नियतीला काही वेगळेच घडवायचे होते. भाऊंचे संगोपन त्या माउलीच्या नशिबी नव्हते. भाऊंच्या जन्मानंतर अवघ्या ४० दिवसानंतर माता राहीबाई यांना देवाज्ञा झाली. मातेचे प्रेम या बाळाला मिळाले नाही. पूर्ण कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला. बाळाचे संगोपन कसे करायचे हा प्रश्न त्यांच्या पुढे उभा होता. राहीबाईने त्यांची आई आबाबाई यांना दृष्टांत दिला व सांगितले 'आई आता तूच माझ्या बाळाची आई हो. तूच माझ्या वामनचा सांभाळ कर.' आबाबाई सकाळी झोपेतून उठल्या त्यांनी बाळाला जवळ घेतले आणि चमत्कार झाला. नातवासाठी आजीला पान्हा फुटला. या आजीनेच भाऊंना लहानचे मोठे केले.

थोर संत वारकरी संप्रदायाचे महामेरू बंकटस्वामी महाराज निनगुरकर यांच्या संपर्कात बाल वयात वामनभाऊ संपर्कात आले.आध्यात्मिक, सांप्रदायिक शिक्षण स्वामीजींच्या माध्यमातून भाऊंनी पुर्ण केले.

आपले संपूर्ण जीवन वारकरी सांप्रदायाला समर्पित करणारे वैराग्य मूर्ती संत वामनभाऊ महाराज. डोंगर दऱ्यातून पायपीट करून या महात्म्याने भागवत धर्माची पताका सर्वत्र फडकवली. 'भाऊ ' हे अतिशय कडक स्वभावाचे होते. असे म्हणले जाते. परंतु चोरी करायला आलेल्या चोरांनाही त्यांनी जेऊ घातले होते. या महात्म्याचा हाच एक प्रसंग. पौष् वद्य ७/८ हा संत वामनभाऊंच्या पुण्य स्मरणाचा दिवस. 'भाऊ ' श्री क्षेत्र गहिनीनाथ गड येथे संत यादवबाबा यांचे उत्तराधिकारी झाले. यानंतर त्यांनी वारकरी सांप्रदायाचे कार्य सुरू केले. आजीवन ब्रह्मचार्यव्रत व त्यागी वृत्तीमुळे त्यांची परिसरात ख्याती होती. वाचासिद्धी प्राप्त असलेल्या या साधूने कधीही महिलांना पायावर दर्शन दिले नाही. महिलांना त्यांचे दुरूनच दर्शन घ्यावे लागे.आजही त्यांच्या समाधीचे दर्शन महिलांना बाहेरूनच घ्यावे लागते. भाऊंनी महिलांचा कधीच अवमान केला नाही सतत सन्मान केला.नाथ संप्रदायाची शिकवन म्हणून महिलां समाजापासुन दुर असत.भाऊंचा स्वभाव कडक होता व ते रागात काही बोलून गेले तर ते सत्य होत असे. म्हणून बरेच लोक त्यांच्या जवळ जायला घाबरत होते. मात्र त्यांच्या शब्दाने असंख्य भक्तांचे कल्याणही झाल्याचे अनेक उदाहरणे समाजात आहेत. वयाच्या १२ व्या वर्षी भाऊंच्या सानिध्यात आलेले धामनगावचे रघुनाथ महाराज चौधरी भाऊंच्या आशीर्वादाने आज शंभरी पार करून ही किर्तन सेवा करत आपण अनुभवलेले भाऊंचे अनेक प्रसंग आपल्या कीर्तनात आवर्जून सांगतात,आज ज्या ठिकाणी श्री क्षेत्र गहिनीनाथ गडाचे बांधकाम आहे त्याच ठिकाणी पूर्वी मोजके बांधकाम झालेले होते. म्हणजे पत्र्याचा निवारा होता. श्रावण महिन्यातील दिवस होते. रात्रीची वेळ रिमझिम पाऊस येत होता.गडावर सर्वत्र भक्त झोपलेले होते.वामनभाऊंना जाग आली व ते हातात कंदील घेऊन बाहेर आले. सध्या यादवबाबा व खंडुबाबांची समाधी आहे त्याच्या मागच्या बाजूला एक छोटा नाला आहे. त्या नाल्यात कोणीतरी लपल्याची चाहूल बाबांना लागली आणि ते आत आले. त्यांनी आपले शिष्य दगडूबा व किसनबा यांना आवाज दिला. ते सहसा त्यांना एकेरीने हाक मारायचे त्याप्रमाणे भाऊ म्हणाले 'किसन्या.... दगड्या उठा, जागे आहेत का झोपलेत, का मेलेत... उठा ' भाऊंचे शब्द कानी पडताच ते दोघे उठले व काय बाबा काय झाले? असे त्यांनी विचारले त्यावेळी त्यांना बाबांनी बाहेर कोणीतरी माणसे लपलेले दिसत आहेत, जाऊन पहाबर असे सांगितले . दगडूबा हे शरीराने धष्टपुष्ट पण भित्र्या स्वभावाचे होते, किसानबा हे किरकोळ पण धाडसी होते. भाऊंच्या आदेशाप्रमाणे ते दोघे तेथे गेले आणि थेट त्या लपलेल्या लोकांपर्यंत जाऊन त्यांची चौकशी केली व तुम्हाला बाबांनी बोलावले असे सांगितले. भाऊंचा आदेश त्या चोरांनाही मोडता आला नाही. ही सर्वमंडळी भाऊंच्या समोर आली त्या वेळी भाऊंनी प्रश्न केला, तुम्ही कोण..कुठले आणि येथे काय करता? त्यावर त्यांना खोटे बोलण्याचे धाडस न झाल्याने त्यांनी आपण



बीडसांगवीचे असून चोरी करायला आलो असल्याचे सांगितले. घरी गेल्या आठ दिवसांपासून खायला दाणा नाही व लेकरबाळ उपाशी आहेत, त्यामुळे आम्ही चोरी करायला आल्याचे त्यांनी सांगितले. भाऊंना त्यांची दया आली. त्या चोरांना भाऊ म्हणाले 'आता तुम्ही जेवण करून येथेच आराम करा'. त्यांना पोटभर जेऊ घातले व सकाळी प्रत्येकाला झेपेल एवढे धान्य सोबत दिले व त्या चोरांना घरी जाण्याची परवानगी दिली. परिणाम असा झाला की, या चारही चोरांनी पुढच्या एकादशीच्या वारीला भाऊंच्या हाताने तुळशीची माळ घातली व चोरी करण्याचे कायमचे सोडून दिले.या अशा अनेक चमत्कारिक अनुभव भाऊंचे भक्त त्यांचा महीमा किर्तनातुन व जिवन चरित्र सांगताना करतात.

वामनभाऊंचे संत भगवानबाबा वर निस्सीम प्रेम स्नेह होता .दोघं शेवटपर्यंत सख्या भावां प्रमाणे वागले.वामनभाऊ बद्दल भगवान बाबांच्या मनात सतत जेष्ठ भावाचा आदर होता.भगवान बाबाला भाऊ सतत लहान भावा प्रमाणे माया लावत.हे दोन संत म्हणजे चंद्र-सुर्या सारखे तेजस्वी होते.दोघांनी ही अजरामर किर्ती केली वामनभाऊंनी पाटोदा तालुक्यातील चिंचोली नाथ येथे श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाची निर्मिती केली.संत भगवान बाबांनी श्रीक्षेत्र भगवानगडाची निर्मिती केली हे दोन्ही गड आध्यात्मिक शक्ती स्थळ व संस्कार, प्रेरणास्थान आहेत.

श्रीक्षेत्र गहिनीनाथगड(चिंचोली-ता.पटोदा, जिल्हा बीड) हे संतश्रेष्ठ वामनभाऊ महाराज यांच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेले तिर्थक्षेत्र आहे.येथूनच वामनभाऊ यांनी वारकरी संप्रदायाचे कार्य सुरू करून ते सर्वत्र पोहोचविले. संत वामनभाऊ महाराज यांचे.हे धर्म कार्य' हे २४जानेवारी १९७६रोजी ईश्वर स्वरूपरात लिन झाल्याने थांबले.पण आजही त्यांच्या दिव्यत्वाची अनुभुती सेवेकरी व भाविक भक्तांना आहे.त्यांचे उत्तराधिकारी ह भ प गोरक्ष महाराज यांनी पुढे चालू ठेवले.त्यांच्यानंतर या गडाचे महंत विठ्ठल महाराज शास्त्री हे आजही श्रीक्षेत्र गहिनीनाथगडाचे पावित्र्य व संत वामनभाऊंचा वसा वारसा वारकरी संप्रदायाची धर्म कार्य नियम परंपरा खंबीरपणे चालवत आहेत.राज्या बाहेर व परदेशात हि संत वामन भाऊ यांचे कार्यमहती प्रसारीत करत आहेत.गडाचे खुप मोठे बांधकाम करून विविध सुविधा उपलब्ध करून देत आहेत.आध्यत्मिक विकासासाठी वारकरी संप्रदायाचे संस्कृत विद्यालय स्थापन केले आहे.यातुन असंख्य विद्यार्थ्यां आध्यात्मिक, वैद, संस्कृत शिक्षण घेत आहेत.आज वैराग्यमुर्ति राष्ट्रसंत वामन भाऊ महाराज यांच्या ४९व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या चरणी कोटी कोटी वेळी नतमस्तक.

लेखक
डॉ राजेंद्र मुरलीधर सानप
अध्यक्ष
श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान
इंद्रप्रस्थ कॉलनी नगर रोड बीड ४३११२२

# आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली नगरपालिकेची आढावा बैठक
# बीड शहरातील नागरी प्रश्नांबाबत दिले निर्देश

बीड ।प्रतिनिधी

शहरातील मुलभूत नागरी प्रश्नांच्या संदर्भात आ.संदीप क्षीरसागर यांनी सोमवारी (दि.२०) रोजी नगर पालिकेची आढावा बैठक घेतली. स्वच्छता, पाणी पुरवठा, रस्ते, नाल्या, वीज आदि मुद्यावरून आ.संदीप क्षीरसागर यांनी अधिकार्यांना सुनावले. प्रत्येकवेळी कोणतेही काम सांगितले तर निधी नाही असे कारण सांगणार्या अधिकार्यांनी नगर पालिकेचे उत्पन्न वाढीसाठी काय प्रयत्न केले ? असा सवालही आ.संदीप क्षीरसागर यांनी उपस्थित केला. पाणी पुरवठ्यात हयगय खपवून घेणार नाही. स्वच्छतेच्या कामांना प्राधान्य द्या आणि उत्पन्न वाढीच्या दृष्टीने तात्काळ उपाययोजना करा असे निर्देश यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी दिले.

बीड नगर पालिकेतील मुख्याधिकार्यांच्या दालनात झालेल्या बैठकीस आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम, मुख्याधिकारी निता अंधारे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. यावेळी नागरीकांनी देखील आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडे शहरातील समस्या मांडल्या. आ.संदीप क्षीरसागर आणि माजी आ.सय्यद सलीम यांनी नगर पालिकेच्या उत्पन्न वाढीच्या अनुषंगाने काही उपाययोजना सुचविल्या आहेत. त्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या सुचना देखील यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी दिल्या. नगरपालिकेतील पाणी पुरवठा व जलनिस्सारण विभाग, बांधकाम विभाग, अग्निशमन विभाग, अभिलेख विभाग, कर विभाग, लेखा परीक्षण विभाग, विद्युत विभाग, संगणक विभाग आदींसह नगररचना विभागाचा आढावाही आ.क्षीरसागर यांनी घेतला. यासोबतच गेल्या काही वर्षांपासून शहरातील मालमत्तांचा रिव्हीजन सर्व्हे झालेला नाही. हा सर्व्हे दर चार वर्षांनी केल्यास उत्पन्न वाढवता येईल. बीओटी तत्वावरील काही इमारती धुळखात पडलेल्या आहेत. त्या वापरात आणून त्यातूनही उत्पन्न वाढविता येऊ शकते. अशा उपाययोजना यावेळी सुचविण्यात आल्या. बीड शहरात एकाही ठिकाणी नगर पालिकेची पार्किंग नाही,त्यामुळे काही जागा ज्या पडीक आहेत, किंवा वापरात नाहीत अशा ठिकाणी व्यवसायीक गाळे आणि पार्किंगची सुविधा उपलब्ध केल्यास त्यातूनही उत्पन्न वाढवता येईल अशा देखील सुचना यावेळी करण्यात आल्या. नाविण्यपुर्ण योजनेतून नगर पालिकेला निधी मिळावा त्या दृष्टीने प्रस्ताव तयार करण्याच्या सुचना आ.संदीप भैय्या क्षीरसागर यांनी दिल्या. शहरात ठिकठिकाणी लोखंडी कचरा कुंड्या ठेवण्यात आलेल्या आहेत. मात्र त्या जाग्यावरच सडून चालल्या आहेत. त्याच्या खरेदीच्या अनुषंगानेही कार्यवाही करावी, स्वच्छता, पाणी पुरवठा, रस्ते, नाल्या, वीज हे मुलभूत



प्रश्न तात्काळ मार्गी लावा त्यात हयगय करू नका लोकांच्या तक्रारी प्राधान्याने सोडवा अशा सक्त सुचना आ.संदीपभैय्या क्षीरसागर यांनी अधिकार्यांना दिल्या.

बीड शहरातील जुन्या भाजी मंडईत नगर पालिकेने मच्छीमार्केटसाठी इमारत बांधलेली आहे. रेडिरेकनर प्रमाणे त्याचे भाडे निश्चित करण्यात आले आहे. भाडे जास्त असल्यामुळे त्या ठिकाणी कोणताच व्यवसायीक पुढे येत नाही त्यामुळे नाममात्र दरात तेथील गाळे व्यवसायीकांना दिल्यास नगर पालिकेचे उत्पन्न वाढू शकते अशी सुचना यावेळी अधिकार्यांना करण्यात आली. त्याचबरोबर जुन्या भाजी मंडईत बीओटी तत्वावरील आणखी कॉम्पलेक्स बांधता येतील का ? या दृष्टीनेही नगर पालिकेने प्रयत्न करावेत. जेणेकरून पालिकेच्या उत्पन्नात भरत पडेल अशीही चर्चा या बैठकीत करण्यात आली.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT